

कोल्हापूर महापालिकेच्या वतीने व्ही.टी. पाटील यांना ना. शिवाजीराव देशमुख हे मानपत्र देत असून छायाचित्रात डावीकडून महापालिका आयुक्त सुधाकर जोशी, महापौर भीमसिंग रजपूत, उपमहापौर बंडोपंत जितकर, स्थायी समिती सभापती मुरलीधर अगरवाल हे दिसत आहेत.
छाया : शशिकांत उरूणकर

# शैक्षणिक क्षेत्रातही कार्यकर्त्यांनी जिवापाड मेहनत घ्यावी

## व्ही.टी.पाटील मानपत्र प्रदान प्रसंगी ना. देशमुख यांचे मत

कोल्हापूर, दि. २ (प्रतिनिधी): 'राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना शैक्षणिक क्षेत्रातही जिवापाड मेहनत घ्यावी लागणार आहे कारण त्या शिवाय खंबीर, जिद्दी व ध्येयवेडी युवापिढी घडविता येणार नाही.' असे उद्‌गार राज्याचे ग्रामीण विकासमंत्री ना. शिवाजीराव देशमुख यांनी काढले.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने व्ही. टी. पाटील यांचा मानपत्र देऊन ना. देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या प्रसंगी ते बोलत होते. केशवराव [illegible] नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर भीमसिंग रजपूत होते.

ना. शिवाजीराव देशमुख आपल्या भाषणात म्हणाले की, जिद्दी व ध्येयवादी माणसांची परंपरा कायम राखण्यासाठी शिक्षणाकडे लक्ष देणे ही काळाची गरज आहे. बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता त्यावेळी व्ही. टी. पाटील यांनी बहादुरीने काम केले. मौनी व ताराराणी विद्यापीठ म्हणजे त्यांच्या कार्याचा शिरपेच आहे.

व्ही. टी. पाटील आपल्या सत्काराला उत्तर देताना म्हणाले की, पराक्रमाचे मूर्तिमंत प्रतिक असलेल्या महाराणी ताराराणींच्या नावे ताराराणी महिला विद्यापीठ येथे होण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला पाहिजे. कारण हा स्त्री जातीच्या कल्याणाचा मार्ग आहे. महापालिकेनेही या कामी शासनाकडे आग्रह धरला पाहिजे.

महापौर भीमसिंग रजपूत यांनी मानपत्राचे वाचन केले. विरोधी पक्षनेते मारुतीराव जिरगे यांनी स्वागत केले. आयुक्त सुधाकर जोशी यांनी आभार मानले.

दैनिक केसरी दि. ५-१०-१९९१



कोल्हापूर महापालिकेतर्फे महापौर भीमसिंग रजपूत यांनी डॉ. व्ही. टी. पाटील यांना मानपत्र दिले.
(छाया : प्रशांत वेल्हाळ)

## डॉ. व्ही. टी. पाटील यांना महापालिकेतर्फे मानपत्र

कोल्हापूर : डॉ. विश्वनाथ तुकाराम पाटील तथा व्ही. टी. पाटील यांना कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने मंगळवारी सायंकाळी महापौर भीमसिंग रजपूत यांच्याहस्ते मानपत्र देण्याचा समारंभ संपन्न झाला. अध्यक्षस्थानी नामदार शिवाजीराव देशमुख होते.

आपल्या सत्कारप्रसंगी बोलताना डॉ. व्ही. टी. पाटील म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी एक स्वतंत्र महिला विद्यापीठ स्थापन करावे व त्याला 'ताराराणी महिला विद्यापीठ' असे नाव द्यावे. महिला विद्यापीठ काढण्याचे माझे हे स्वप्न महाराष्ट्र शासनाने पुरे करावे व कोल्हापूरचे पालकमंत्री श्री. शिवाजीराव देशमुख यांनी मुख्य मंत्र्यांकडून हे काम